# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.06.2026** **वारःशुक्रवार**

1. जागतिक अस्थिरतेच्या वातावरणातही भारत आत्मविश्वासाने विकासाच्या मार्गावर पुढे जात असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. नीती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांकडून महाराष्ट्राच्या प्रगतीचा आराखडा सादर
3. इथेनॉल-मिश्रित पेट्रोलला केंद्रीय उत्पादन शुल्कातून सूट देण्याचा सरकारचा निर्णय आणि
4. एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता 58 टक्क्यांपर्यंत वाढविण्याची परिवहन मंत्र्यांची घोषणा

**मोदी-नीती आयोग**

जागतिक स्तरावर अनिश्चितता आणि अस्थिरतेचे वातावरण असतानाही भारत आत्मविश्वासाने आणि निर्धाराने विकासाच्या मार्गावर पुढे जात असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रपती भवनात आयोजित, नीती आयोगच्या नियामक मंडळाच्या 11 व्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते काल बोलत होते. विकसित भारत-2047साठी सर्वसमावेशक मानवी विकास’ अशी या बैठकीची मुख्य संकल्पना होती. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांची सामूहिक जबाबदारी महत्त्वाची आहे; राज्यांमध्ये सहकार्य, संवाद आणि अनुभवांची देवाणघेवाण वाढवणही आवश्यकता आहे; यासाठी नीती आयोग प्रभावी भूमिका बजावू शकतो, असं पंतप्रधान म्हणाले.

**नीती आयोग**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील या बैठकीला उपस्थित होते. यावेळी त्यांनी 'विकसित महाराष्ट्र-2047' चा पथदर्शी आराखडा सादर केला. विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासन, शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक मानवी विकास या पाच प्रमुख क्षेत्रांवर विशेष भर देत असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिली. राज्याने 2030 पर्यंत एक ट्रिलियन डॉलर आणि 2047 पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्याचं लक्ष्य ठेवलं असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. आकांक्षित जिल्हे-तालुक्यांच्या शाश्वत विकासावर सरकारचा विशेष भर आहे, तसंच युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगार संधी देण्याचं नियोजन आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**सवलत-मुंबई**

सरकारनं इथेनॉल मिश्रित पेट्रोलला केंद्रीय उत्पादन शुल्कातून सूट दिली आहे. बीआयएस मानकांनुसार असलेल्या 22 टक्के, 25 टक्के, 27 टक्के आणि 30 टक्के इंधन मिश्रणांवर शून्य उत्पादन शुल्क आकारलं जाईल. अर्थ मंत्रालयानं काल या संदर्भातली अधिसूचना जारी केली. भारताचं कच्च्या

तेलावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**<u>एसटी</u>**

एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे 53 टक्क्यांवरून 58 टक्क्यांपर्यंत वाढविण्याची घोषणा परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. कर्मचाऱ्यांच्या घरभाडे भत्त्यात देखील वाढ करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. मुंबईतील महामंडळाच्या मुख्यालयात राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत काल महत्त्वपूर्ण बैठक झाली; त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.

**<u>गीते-माघार-नाशिक</u>**

नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत अपक्ष उमेदवार गोकूळ गिते यांनी माघार घेतली आहे. मंत्री गिरीश महाजन, उदय सामंत आणि दादा भुसे यांच्या शिष्टाईनंतर हा निर्णय घेण्यात आला. महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना पाठिंबा देण्यासाठी नव्हे, तर ते महायुतीचे अधिकृत उमेदवार असल्याने माघार घेत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र, अधिकृत मुदत संपल्यानंतर माघार घेतल्याने गिते यांचे नाव मतपत्रिकेवर कायम राहणार आहे.

**<u>कुंभमेळा-नाशिक</u>**

नाशिक इथं पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा काल मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत झाला. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे 31 ऑक्टोबर रोजी धर्मध्वजारोहण होऊन कुंभमेळा पर्वाला प्रारंभ होणार आहे. या कुंभमेळयासाठी 12 कोटींपेक्षा जास्त भाविक येण्याची अपेक्षा आहे.

**<u>कुंभार-नागपूर</u>**

राज्यातील कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला चालना देण्यासाठी विटा, कावेलू निर्माते आणि मूर्तिकारांना वर्षाकाठी 700 ब्रासपर्यंत माती तसेच वाळू मोफत देण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. या बरोबरच वीज निर्मिती केंद्रांमधून उपलब्ध होणारी फ्लाय ॲशदेखील देण्यात येणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. ते काल नागपूर इथं प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

**<u>परिषद-अहिल्यानगर</u>**

पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या वतीने, पर्यटन मंत्रालय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट यांच्या सहकार्याने तिसरी जागतिक आध्यात्मिक पर्यटन परिषद आज आणि उद्या शिर्डी इथं आयोजित करण्यात आली आहे. भारतामधील वेगाने वाढणाऱ्या आध्यात्मिक पर्यटन क्षेत्राच्या भविष्यासंदर्भात विचारमंथन करण्यासाठी आयोजित या परिषदेत धोरणकर्ते, पर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञ, मंदिर प्रशासक, आदरातिथ्य क्षेत्रातील प्रतिनिधी, विविध आध्यात्मिक संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. सिंहस्थ कुंभमेळा 2027-28 हा यंदाच्या परिषदेचा केंद्रबिंदू आहे.

**वृक्षसंवर्धन-पालघर**

पालघर जिल्ह्यातल्या तलासरी तालुक्यामधल्या अणवीर गावाने पर्यावरण संरक्षणाबरोबरच ग्रामीण रोजगारालाही नवी दिशा देण्याचं काम केलं आहे. मनरेगाअंतर्गत राबवलेल्या वृक्षारोपण उपक्रमातील 95 टक्के रोपांचं यशस्वी संवर्धन या गावाने केलं आहे. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून.....

**जिल्हा प्रशासन, मनरेगा, सामाजिक वनीकरण विभाग आणि यशराज रिसर्च फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम राबवण्यात आला. विशेष म्हणजे 'ट्री गार्ड सिस्टम' आणि ठिबक सिंचनाच्या आधुनिक तंत्रामुळे झाडांचे संरक्षण आणि पाण्याची बचत प्रभावीपणे झाली. या प्रकल्पातून आतापर्यंत 631 मनुष्य-दिवस रोजगार निर्माण झाला असून सुमारे 1 लाख 92 हजार रुपयांची मजुरी थेट कामगारांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. महिलांनीही या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत आर्थिक सक्षमीकरणाची नवी वाट खुली केली आहे. विद्यार्थ्यांना झाडांची जबाबदारी देऊन पर्यावरण संवर्धनाची जाणीवही रूजवण्यात आली आहे. त्यामुळे अणवीर गावाचा हा हरित उपक्रम आज राज्यातील इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरत असून, शाश्वत विकासाचे एक यशस्वी मॉडेल म्हणून हे गाव समोर येत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी पालघरहून नीता चौरे.**

**राष्ट्रवादी**

राष्ट्रवादी काँग्रेसचा 27 वा वर्धापन दिन काल मुंबईत साजरा करण्यात आला. पक्षाच्या अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सहा वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. अजित दादांना अपेक्षित असलेला विकसित महाराष्ट्र उभा करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता कटिबद्ध राहिल असा विश्वास सुनेत्रा पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

**पॉश**

कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारा लैंगिक छळ रोखण्यासाठी पॉश कायद्यानुसार समिती स्थापन करणे अनिवार्य असून या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची तातडीने तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. जगदीश मिनीयार यांनी दिले आहेत. या संदर्भात मिनीयार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीद्वारे बैठक झाली. या बैठकीला राज्यातील जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.ज्या कार्यालये अथवा आस्थापनांमध्ये योग्य अंमलबजावणी होत नाही, त्यांच्यावर अधिनियमातील कलम 26 नुसार दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत.

**आरोग्य**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या केंद्रीय अतिरिक्त सचिव आणि व्यवस्थापकीय संचालक आराधना पटनाईक यांची कर्तव्य भवनमध्ये काल भेट घेतली. 2026-27 च्या कार्यक्रम अंमलबजावणी आराखड्यांतर्गत निधी मंजुरी तसेच अतिरिक्त निधीच्या मागणीसाठी ही बैठक महत्त्वाची मानली जात होती.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी लाभार्थी बालकांची वयोमर्यादा दोन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविण्यास या बैठकीत तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून लोकाभिमुख योजना राबवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामध्ये समन्वय वाढवण्यावर भर दिला जात आहे.

**पुणे -पाणी कपात**

पुण्याला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत अत्यंत कमी पाणीसाठा शिल्लक असल्याने पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये पाणी कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या सोमवारपासून पुण्यात एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जाईल. महापालिकेने या संदर्भात, विविध प्रभाग आणि तिथल्या सम आणि विषम तारखांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्याचबरोबर पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचं आवाहनही महापालिकेनं केलं आहे.

**वीरगती**

जम्मू-काश्मीरमधील उरी सेक्टरजवळील कमलकोट इथं झालेल्या भीषण स्फोटात महाराष्ट्राच्या दोन वीर सुपुत्रांना वीरमरण आलं. विक्रम चव्हाण हे नवी मुंबईतील ऐरोली येथील, तर अर्जुन जाधव हे सातारा जिल्ह्यातील शहापूर येथील रहिवासी होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दोन्ही हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे, त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**गंगापूर धरण-नाशिक**

नाशिकच्या गंगापूर धरणाच्या जलाशयामध्ये अंघोळीसाठी उतरलेल्या एकाच कुटुंबातील चौघांचा काल पाण्यात बुडून मृत्यू झाला. हे सर्वजण नाशिक तालुक्यातील सावरगावचे होते.

**क्रिकेट**

इंग्लंडमध्ये आजपासून महिलांच्या वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला सुरुवात होत आहे. यात 12 संघ सहभागी होत आहेत. भारतीय संघाचा पहिला सामना 14 जून रोजी बर्मिंगहॅम येथे पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ या विश्वचषकाचे विजेतेपद मिळवण्यास सज्ज झाला आहे.

**हवामान**

कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी आज सोसाट्याचा वारा, विजांसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचीही शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**